www.ecourtsindia.com



नियमीत फौ.प्र.क्र.१५०९/२०२०

सरकार ..वि.. दिनेश सावळे

**नि.क्र. ४६**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ ची साक्ष शपथेवर सुरु**

नांव : अजय जयसिंग चांदणे

वय – ३० वर्षे, धंदा – हमाली,

रा. विलास नगर, अमरावती.

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी वकील श्री एस.एन. वानखडे यांच्यामार्फत् शपथेवर सुरू**

०१. दिनांक २८/१०/२०१८ रोजी पोलीसांनी मला आरोपीच्या घरी घटनास्थळ पंचनामा तयार करण्याकरिता बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता तसेच कोणतीही वस्तु जप्त केली नव्हती. घटनास्थळ पंचनामा आता मला दाखविला असता, त्यावरील माझी असलेली सही मी ओळखतो. घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष तयार करण्यात आला नसल्यामुळे, मला त्यातील मजकुर माहिती नाही. **घटनास्थळ पंचनाम्यावरील माझी सही नि.क्र.४७ वर** आहे.

०२. दिनांक २८/१०/२०१८ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे आरोपीच्या ताब्यातुन तलवार जप्त करण्याकरीता बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन कोणतीही वस्तु जप्त केली नव्हती. जप्ती पंचनामा आता मला दाखविला असता, त्यावरील माझी असलेली सही मी ओळखतो. जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार करण्यात आला नसल्यामुळे, मला त्यातील मजकुर माहिती नाही. **जप्ती पंचनाम्यावरील माझी सही नि.क्र.४८ वर** आहे.

***(साक्षीदार सरकार पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, अभियोग पक्षाच्या वतीने त्याच्या उलटतपासाची परवानगी मागण्यात आली. परवानगी मंजुर करण्यात आली.)***

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030076812020-orderno-1.pdf

www.ecourtsindia.com



**<u>साक्षीदाराचा उलटतपास अभियोग पक्षाच्या वतीने विधीज्ञ श्री एस.एन. वानखडे यांच्यामार्फत</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८/१०/२०१८ रोजी पोलीसांनी मला आरोपीच्या घरी घटनास्थळ पंचनामा तयार करण्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीच्या घरातुन एक ५.१ इंच मुठ व २५ इंच लांबीची तलवार जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलींसानी माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यातील मजकुर बरोबर असल्याने मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचदिवशी पोलीसांनी मला जप्ती पंचनामा करण्याकरिता गाडगे नगर पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे आरोपीच्या ताब्यातुन तलवार जप्त करून, त्याबाबतचा जप्ती पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनाम्यातील मजकुर बरोबर असल्यामुळे मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता आज मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपी तर्फे उलटतपास श्री एस.एन. अगमे वकील</u>**

नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत, समक्ष

( पी.के.नरडेले )
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती
दि. २०.०३.२०२५

( पी.के. नरडेले )
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.१, अमरावती

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAM030076812020-orderno-1.pdf